# 'निर्माण'च्या अनुभवांनी दिली युवकांना वैचारिक प्रगल्भता

गडचिरोली, दि. ८ (प्रतिनिधी) - डॉ. अभय बंग व डॉ. राणी बंग यांनी सर्च संस्थेच्या पुढाकाराने शोधग्राममध्ये सुरू झालेल्या निर्माण शिबिराचा मी, समाज व सृष्टी यांच्यातील संबंध व जबाबदारीचा भान शोधून नव्या प्रवाशात सुरुवात करायची होती. या आठ दिवसांत शिबिरार्थी पहाटे ६ वाजता भूपाळीने सुरुवात करायचे. त्यानंतर विज्ञानाच्या सोबतीने अनोखे श्रमदान करीत यामध्ये कंटूर मार्कर व एक डोंब बनवायला त्यांनी घेतला होता. दिवसभरातल्या सत्रानंतर सायंकाळी प्रार्थना होत असे. प्रार्थनेनंतर दिवसभरात झालेले सत्र व त्यातून झालेला आंतरिक प्रवास याविषयी आढावा घेण्यात येई. या शिबिरातून युवांनी वैचारिक प्रगल्भता प्राप्त केली.



निर्माण शिबिरात एकमेकांशी संवाद साधताना युवा.

शिबिरात दाखल होण्यापूर्वी ६ महिन्यांत काय काय केले यावरच्या सत्रात अनेक गोष्टी समोर आल्या. या शिबिरार्थ्यांनी शोधग्रामहून जाताना काही वैयक्तिक तर काही गटाने संकल्प केले होते. त्यात कचऱ्याचे व्यवस्थापन, कचराप्रश्न समाजावून घेणे, डोळे तपासणी कॅम्प, वृद्धाश्रम व रिमांडहोमच्या मुलांसोबत वेळ व्यथित करणे, अनाथालयात व स्लम एरियात जाऊन वेळ देणे व शिकविणे, फिल्म क्लब सुरू करणे, पुस्तकांचे वाचन व चर्चा, निर्माणची वेबसाईड तयार करणे, हस्तलिखित अंक, नियमित व्यायाम, बिहारच्या पूरग्रस्तांना मदत करण्यासाठी निर्माण शिबिरार्थी वैद्यकीय शिक्षण घेत असलेल्या काही युवांनी आपले कर्तव्य तसेच शिक्षणाचाच एक भाग म्हणून जवळपास ४५ दिवस तेथे राहून काम केले. आपली प्रॅक्टिश शहरी भागातच नव्हे तर ग्रामीण भागातही सुरू करायचा संकल्प केला. एका शिबिरार्थ्याने चहाटपरीवर भेटलेल्या एका मुलाला रात्रीच्या शाळेत घालून त्याची राहण्याची व्यवस्था केली. लोकल ट्रेनमध्ये कचरा न होऊ देणे, खाडीत फेकत असलेल्या निर्माल्यासाठी वेगळ्या उपाययोजना करणे यांसारखे अनेक उपक्रम यशस्वीपणे पार पाडले. या अनुभवांनी एक नवी दृष्टी मिळाल्याचे शिबिरार्थ्यांना वाटते.

निर्माणमुळे दुराव्याच्या, अनोळखीपणाच्या भिंती नाहीशा झाल्या. घंटागाडीचा कामगार असो वा कचरा वेचणारा मुलगा त्यांच्यासोबत गळ्यात हात टाकून ते कामात मदत करण्यापर्यंत अनुभव घेतले. यामुळे आपल्या मैत्रीच्या कक्षा अधिक रुंदावल्याचेही शिबिरार्थ्यांना वाटते. बाहेरच्या शिक्षणापेक्षा निर्माणप्रक्रियेमुळे प्रत्यक्ष अनुभवातून जास्त शिक्षण होतंय असं वाटते. या सत्रात लेखक अनिल अवचट यांनी युवकांशी संवाद साधून त्यांना व्यसनमुक्ती विषयाबाबत जागरूक केले. एक चतुरस्त्र व्यक्तिमत्त्व, उत्तम चित्रकार, एक कवी, लेखक व संगीताची उत्तम जाण अनिल अवचट यांना आहे. ते डॉक्टर असून मुक्तांगण ही व्यसनमुक्तीसाठी त्यांची संस्था कार्यरत आहे. त्यांच्या आगमनाने शिबिरात चैतन्याची लहर दाखल झाल्याचे मनोगत शिबिरार्थ्यांनी व्यक्त केले. व्यसनावरील काही पोवाडे त्यांनी म्हटले.

डॉ. राणी बंग यांनी गडचिरोलीत दारूमुक्ती आंदोलनाविषयी संवाद साधला. लोकजागृती, संघटन व प्रत्यक्ष कृती, संघर्ष यांतून या प्रयत्नांना कसे यश मिळाले याबद्दल सांगितले. गडचिरोलीत सामान्य नागरिकांनी विशेषत: स्त्रिया व युवकांनी उभारलेल्या दारूमुक्तीच्या ऐतिहासिक लढ्याची कथा ऐकताना निर्माण युवा भारावले होते. गडचिरोली हा भारतातील पहिला दारूमुक्त झालेला जिल्हा असून लोकांनीच दिलेला हा लढा होता.

दुपारच्या सत्रात निर्माण शिबिरातून ज्यांनी फेलोशिपचा प्रवास सुरू केला अशा आठ स्वाध्याय या निर्माणप्रक्रियेतून कसे घडत जात आहेत याविषयी दत्ता बाळसराफ यांनी सांगितले. निर्माणमध्ये दाखल झाल्यापासून कुणाला घरचा विरोध तर कधी मित्रांशी वाद, कधी स्वत:च्याच संस्कारांशी संघर्ष, भौतिक सुखाचे आकर्षण, एकीकडे महात्मा गांधींनी दाखवून दिलेला नई तालीमचा मार्ग यातील द्वंद्व या काळात सुरू होते. मात्र प्रत्येक पावलावरील संघर्षाला तोंड दिले व एकेका गोष्टीचे आकर्षण कमी होत गेले. पर्यावरणाशी समतोल राखणाऱ्या जीवनशैलीचा अभ्यास करून माझ्या कामातून समाजाशी नाते कसे जोडता येईल, हा प्रयत्न सुरू झाल्याचे स्वध्यार्यींनी सांगितले. रोजगार हमी योजना, सॉईल कन्झर्व्हेशन व जलसंधारण, शेतीचे प्रश्न, कुपोषण, शिक्षण, आदिवासींचे प्रश्न, शाश्वत विकासाला पूरक जीवनशैलीसारख्या प्रश्नांवर हे स्वध्यायी अभ्यास व कृती करीत आहेत.